# ई - पोलीस पत्रिका

दिनांक १२/०२/२०२५ अनु.क्र. ३१

### (अमरावती शहर पोलीसांची २०२५ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.
- महीला, मुले व जेष्ठ नागरिकांचीसुरक्षा.
- जातीयसलोखा वाढविणे.
- संघटितगुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीसकोठडीतगुन्हे घडु न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## रजा

**१.पोआअ/आस्था-५/आज्ञांकित कक्ष/११९१/२०२५अमरावती शहर दिनांक ०६/०२/२०२५**

## आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवरील पोना/१०३६, अमोल अं. वाहने नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर  हे आजाराच्या कारणास्तव कर्तव्यावर अनुपस्थित राहील्याने त्यांना कर्तव्यावर हजर करुन घेण्यासाठी ते दिनांक ०६/०२/२०२५ रोजी **मा.पोलीस आयुक्त यांचे** समक्ष आज्ञांकित कक्षेत उपस्थित झाले आहे. सदर पोलीस अंमलदार यांना कर्तव्यावर हजर करण्यात यावे. तसेच वैद्यकीय मंडळ यवतमाळ, यांच्या वैद्यकीय तपासणी अहवालातील अभिप्रायानुसार म.ना.से.(रजा) नियम १९८१ मधील नियम ६३ नुसार तरतुदीनुसार दिनांक २४/०१/२०२४ ते दिनांक ०६/०२/२०२५पर्यंत३७९ दिवस अनाधिकृतपणे गैरहजर कालावधी हा असाधारण रजा(विनावेतन) मंजुर करण्यात येत आहे.

सदर पोलीस अंमलदार हे कर्तव्यावर हजर झाल्याच्या दिनांका पासुन त्यांचे **वेतन** सुरु करण्यात यावे. तसेच दिनांक २४/०१/२०२४ ते ०६/०२/२०२५ पर्यंत एकुण ३७९ दिवसाचे वेतन अतिप्रदान त्यांचे वेतनामधुन समान हप्त्यामध्ये वसुल करण्यात यावे.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## शिक्षा

**१.पोआअश/विचौ-२/कसुरी अहवाल/गैरहजर/पोशि-१६९६ भलावी + २/६०५/२०२५ अमरावती शहर दिनांक २१/०१/२०२५**

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिले. तुमचे मौखीक म्हणणे मांडण्याकरीता बिनतारी संदेश क्र.१००/२०२४, दिनांक २५/०६/२०२४ अन्वये दिनांक २६/०६/२०२४ चे १२.०० वा. मा.पोलीस उपायुक्त (मुख्या.), अमरावती शहर यांचे आज्ञांकित कक्षात बोलविण्यात आले होते, परंतु तुम्ही आज्ञांकित कक्षात हजर झाले नसुन सदरचा गैरहजर कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ६३ (६) चे तरतुदीनुसार **असाधारण रजा** मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व पदनाम | नेमणुक ठिकाण | थोडक्यात कसुरी | गैरहजर कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोकॉ/१६९६ प्रशांत भलावी | पो.स्टे. खोलापुरी गेट अम.शहर | दिनांक ०७/०५/२०२३ पासुन ते दिनांक १२/०५/२०२३ पर्यत वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता अनाधिकृतपणे गैरहजर राहिले. | दिनांक ०७/०५/२०२३ ते दिनांक १२/०५/२०२३ पर्यत एकुण ०६ दिवस गैरहजर. | **एकुण २३ दिवस असाधारण रजा (विनावेतन)** |
| | | | दिनांक ०२/१०/२०२३ ते दिनांक १९/१०/२०२३ पर्यत वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता अनाधिकृत गैरहजर राहिले. | दिनांक ०२/१०/२०२३ ते दिनांक १९/१०/२०२३ पर्यत एकुण १७ दिवस गैरहजर.<br><br>**एकुण ०६ +१७ =२३ दिवस गैरहजर.** | |
| ०२ | पोहवा/२४९ सिध्देश्वर गुटे | पो.मुख्या., अम.शहर | दिनांक ०१/११/२०२३ पासुन ते दिनांक २२/११/२०२३ पर्यत किरकोळ रजा गैरहजर राहिले. | दिनांक ०१/११/२०२३ पासुन ते दिनांक २२/११/२०२३ पर्यत **एकुण २२ दिवस गैरहजर.** | **एकुण २२ दिवस असाधारण रजा (विनावेतन)** |
| ०३ | पोहवा/८४८ राजेश पिसोळे | पो.मुख्या., अम.शहर | दिनांक १८/१०/२०२३ पासुन ते दिनांक १४/११/२०२३ पर्यत वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कर्तव्यावर गैरहजर राहिले. | दिनांक १८/१०/२०२३ ते १४/११/२०२३ पर्यत **एकुण २८ दिवस गैरहजर.** | **एकुण २८ दिवस असाधारण रजा (विनावेतन)** |

**२.पोआअश/विचौ-२/कसुरी अहवाल/गैरहजर/पोशि-१७०५परतेकी/६०९/२०२५ अमरावती शहर**
**दिनांक २१/०१/२०२५**

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिले असुन सदरचा गैरहजर कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ६३ (६) चे तरतुदीनुसार **असाधारण रजा** मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नाव व पदनाम | नेमणुक ठिकाण | थोडक्यात कसुरी | गैरहजर कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोकॉ/१७०५ गजानन परतेकी | पो.मुख्या. अम.शहर | दिनांक ०६/१०/२०२३चे २०:१५ वाजता पासुन ते दिनांक ०७/१०/२०२३ चे ११:०० वाजता पर्यत पोलीस कॅन्टीन गार्ड कर्तव्या वरुन गैरहजर राहिले. | दिनांक ०६/१०/२०२३ पासुन ते दिनांक ०७/१०/२०२३ पर्यत एकुण ०१ दिवस गैरहजर. | **एकुण १२ दिवस असाधारण रजा (विनावेतन)** |
| | | | दिनांक ०६/११/२०२३ पासुन ते दिनांक १६/११/२०२३ पर्यत कर्तव्या वरुन गैरहजर राहिले. नमुद पोलीस अंमलदार यांचे पत्नीने नमुद पोलीस अंमलदार यांना कर्तव्यावर हजर करुन घेवुन सीक पास मिळणे बाबत विनंती अर्ज सादर केल्याने परस्पर हजर करुन घेवुन दिनांक १७/११/२०२३ चे ११:०५ वाजता सीक पास देण्यात आली आहे. | दिनांक ०६/११/२०२३ पासुन ते दिनांक १६/११/२०२३ पर्यत एकुण ११ दिवस गैरहजर. **एकुण ०१ + ११ = १२ दिसव गैरहजर.** | |

**३.पोआअश/विचौ-२/कसुरी अहवाल/गैरहजर/पोशि-१७३४ राजेंद्र पारडे/६०८/२०२५ अमरावती शहर दिनांक २१/०१/२०२५**

**आदेश**

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिले असुन सदरचा गैरहजर कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ६३ (६) चे तरतुदीनुसार **असाधारण रजा** मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नाव व पदनाम | नेमणुक ठिकाण | थोडक्यात कसुरी | गैरहजर कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोशि/१७३४ राजेंद्र पारडे | शवाशा (पुर्व) सध्या पो.मुख्या. उजळणी कोर्स | दि.२४/०२/२४ रोजी २०:०० वा. जिल्हा मध्यवर्ती कारागृह मेनगेट सुरक्षा गार्ड कर्तव्यावरुन वरिष्ठांना पुर्व सुचना न देता गैरहजर राहिले. दिनांक ११:४५ वा. हजर. | दि. २४/०२/२४ ते दि.२८/०२/२४ पर्यत ०५ दिवस गैरहजर. | **एकुण २९ दिवस असाधारण रजा (विनावेतन)** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | दि.०३/०३/२४ रोजी चे ०९:०५ वा. पोलीस नियंत्रण कक्ष, अम.शहर येथे स्ट्रॅकींग फोर्स रिझर्व (SF) होते. परंतु वरिष्ठांना पुर्व सुचना न देता गैरहजर राहिले. दिनांक २६/०३/२०२४ चे २०:०५ वा. हजर. | दि. ०३/०३/२४ ते दि.२६/०३/२४ पर्यत २४ दिवस गैरहजर.<br><br>**एकुण ०५+२४ = २९ दिसव गैरहजर.** | |

**४.पोआअश/विचौ-२/कसुरी अहवाल/गैरहजर/पोना-१४०१ धुर्वे/६०७/२०२५ अमरावती शहर**
**दिनांक २१/०१/२०२५**

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिले. सदरचा गैरहजर कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ६३ (६) चे तरतुदीनुसार **असाधारण रजा** मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र | नाव व पदनाम | नेमणुक ठिकाण | थोडक्यात कसुरी | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोना/१४०१ विजय धुर्वे | तत्का. पो.मुख्या., (सध्या नेम. पो.स्टे.राजापेठ) अम.शहर | दि.१९/०४/२०२४ रोजी EVM सुरक्षा गार्ड लोकशाही भवन अमरावती येथे कर्तव्य नेमलेले असतांना १३:४५ वाजता कर्तव्यावर गैरहजर मिळुन आले. दि.२९/०४/२०२४ रोजी २१:०० वाजता कर्तव्यावर हजर. | दि.१९/०४/२०२४ पासुन ते दि. २९/०४/२०२४ पर्यत ११ दिवस गैरहजर. | **एकुण २४ दिवस असाधारण रजा (विनावेतन)** |
| | | | दि.०९/०५/२०२४ रोजी EVM सुरक्षा गार्ड लोकशाही भवन अमरावती येथे कर्तव्य नेमलेले असतांना २२:३० वाजता कर्तव्यावर गैरहजर मिळुन आले. दि.२१/०५/२०२४ रोजी २०:४५ वाजता कर्तव्यावर हजर. | दि. ०९/०५/२०२४ पासुन ते दि. २१/०५/२०२४ पर्यत १३ दिवस गैरहजर.<br><br>**एकुण ११+१३=२४ दिवस गैरहजर** | |

**५.पोआअश/विचौ-२/कसुरी अहवाल/गैरहजर/पोशि-१८६२ धनकर/६०६/२०२५ अमरावती शहर**
**दिनांक २१/०१/२०२५**

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार हे शहर वाहतुक शाखा (पश्चिम), अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन त्यांचे नावासमोर दर्शविलेल्याप्रमाणे वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता अनाधिकृतपणे गैरहजर राहिले असल्याने गैरहजर कसुरी अहवाल या कार्यालयात प्राप्त झाला आहे. प्राप्त गैरहजर कसुरी अहवालाचे अवलोकन केले असुन त्यांचा गैरहजर कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ५० चे तरतुदीनुसार **अर्जित रजा मंजुर** करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नाव व पदनाम | नेमणुक ठिकाण | थोडक्यात कसुरी | गैरहजर कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोशि/१८६२ अमित धनकर | श.वा.शा. (पश्चिम) अम. शहर | दि.२७/११/२०२३ चे १७.२० वा.पासुन ते दि. २८/११/२०२३ चे २१.०१ वा. पर्यत गैरहजर. | दि.२७/११/२०२३ ते दि. २८/११/२०२३ पर्यत ०२ दिवस गैरहजर. | **एकुण २३ दिवस अर्जित रजा** |
| | | | दि.०९/१२/२०२३ चे १४.२० वा.पासुन ते दि. २२/१२/२०२३ चे २१.०५ वा. पर्यत गैरहजर. | दि.०९/१२/२०२३ ते दि. २२/१२/२०२३ पर्यत१४ दिवस गैरहजर. | |
| | | | दि.३१/१२/२०२३ चे १६.०५ वा.पासुन ते दि. ०६/०१/२०२४ चे ११.४० वा. पर्यत गैरहजर. | दि.३१/१२/२०२३ ते दि. ०६/०१/२०२४ पर्यत ०७ दिवस गैरहजर.<br>**एकुण ०२+१४+७ = २३** | |

**६.पोआअश/विचौ-२/कसुरी अहवाल/गैरहजर/पोशि-१४०८ लुटे + २/७७५/२०२५ अमरावती शहर**
**दिनांक २७/०१/२०२५**

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिले. सदरचा गैरहजर कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ६३ (६) चे तरतुदीनुसार **असाधारण रजा** मंजुर करण्यात येत आहे.

| अ क्र | नाव व पदनाम | नेमणुक ठिकाण | थोडक्यात कसुरी | कालावधी/खुलसा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोशि/१४०८ श्रीकांत लुटे | दंगा नियत्रण पथक, अम.शहर | दि.१०/०५/२०२४ ते दि.१५/०५/२०२४ पर्यत कोणतीही पुर्व सुचना न देता अनाधिकृतपणे गैरहजर राहिले. | दि. १०/०५/२०२४ ते दि. १५/०५/२०२४ पर्यत एकुण ०६ दिवस गैरहजर. | **एकुण ०६ दिवस असाधारण रजा (विनावेतन)** |
| २ | पोशि/४१८ रामकिसन | पो.मुख्या., अम.शहर | दि.२६/०७/२०२४ ते दि.०७/०८/२०२४ पर्यत | दि. २६/०७/२०२४ ते दि. ०७/०८/२०२४ | **एकुण १३ दिवस** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दुधकावरे | | कोणतीही पुर्व सुचना न देता अनाधिकृतपणे गैरहजर राहिले. | पर्यत एकुण १३ दिवस गैरहजर. | **असाधारण रजा (विनावेतन)** |
| ३ | मपोशि/१७४३ बबिता खडसे | पो.मुख्या., अम.शहर | दि.१८/०७/२०२४ चे ०८.०० वा. गणणेवर हजर राहणे अपेक्षित असतांना दि. ०२/०८/२०२४ पर्यत गणना गैरहजर राहिल्या. | दि. १८/०७/२०२४ ते दि. ०२/०८/२०२४ पर्यत १६ दिवस गैरहजर. | **एकुण १७ दिवस असाधारण रजा (विनावेतन)** |
| | | | दि.०८/०८/२०२४ चे ०८.१५ वा. गणणेवर हजर राहणे अपेक्षित असतांना दि. ०८/०८/२०२४ चे १४.४५ वा. पर्यत गणना गैरहजर राहिल्या. | दि. ०८/०८/२०२४ ०१ दिवस गैरहजर.<br><br>एकुण १६+०१= १७ दिवस. | |

**७.पोआअश/विचौ-२/कसुरी अहवाल/गैरहजर/पोना-७७८ प्रधान + १/७६०/२०२५ अमरावती शहर दिनांक २७/०१/२०२५**

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिले असुन सदरचा गैरहजर कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ५० चे तरतुदीनुसार **अर्जित रजा मंजुर** करण्यात येत आहे.

| अ क्र | नाव व पदनाम | नेमणुक ठिकाण | थोडक्यात कसुरी | गैरहजर कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोना/७७८ सुरेश प्रधान | पो.मुख्या., अम. शहर | दि.०८/१२/२०२३ ते दि. १४/१२/२०२३ पर्यत वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता अनाधिकृतपणे गैरहजर राहिले. | दि.०८/१२/२०२३ ते दि. १४/१२/२०२३ पर्यत एकुण ०७ दिवस गैरहजर. | **एकुण ०७ दिवस अर्जित रजा** |
| २ | पोशि/१८१६ निरज ठाकुर | पो.मुख्या., अम. शहर | दि.२६/१२/२०२३ चे २१.४० वा. रात्रपाळी कर्तव्यावरुन दि. ३०/१२/२०२३ पर्यत वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता अनाधिकृतपणे गैरहजर राहिले. | दि.२६/१२/२०२३ ते दि. ३०/१२/२०२३ पर्यत एकुण ०५ दिवस गैरहजर. | **एकुण ०५ दिवस अर्जित रजा** |

**८.पोआअश/विचौ-२/कसुरी अहवाल/गैरहजर कालावधी/भोजन सेवक-जामनेकर/७६१/२०२५ अमरावती शहर दिनांक २७/०१/२०२५**

**आदेश**

खालील नमुद भोजन सेवक, नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांनी त्यांच्या वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता स्वमर्जीने कर्तव्यावरुन गैरहजर राहिले असल्याचे निदर्शनास आले असुन कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहुन बेशिस्तपणाची गैरवर्तणुक केले असल्याने सदरचा गैरहजर कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ६३ (६) चे तरतुदीनुसार **असाधारण (विनावेतन) रजा** मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नाव व पदनाम | नेमणुक ठिकाण | थोडक्यात कसुरी | कालावधी | विनावेतन |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री निरज जामनेकर, भोजन सेवक | पो.मुख्या. अम.शहर | दि. ०२/१२/२०२४ रोजी ०८.०० वा. पासुन मा.पोलीस आयुक्त यांचे शासकीय निवासस्थानी भोजन सेवक चे कर्तव्य नेमले असता नमुद भोजन सेवक हे नेमुण दिलेल्या कर्तव्यावर आले नसल्याने लाईन दफेदार मदतनीस पोहवा/०३ राहुल रेडे हे भोजन सेवक यांचे घरी बोलविण्यास गेले असता नमुद भोजन सेवक हे घरी हजर मिळुन आले नाही. दि.०२/१२/२०२४ ते दि. २५/१२/२०२४ पर्यत कोणतीही पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिले होते. | दि.०२/१२/२०२४ ते दि.२५/१२/२०२४ पर्यत एकुण २४ दिवस गैरहजर. | **एकुण २४ दिवस असाधारण रजा (विनावेतन)** |

# भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**१.पोआअ/प्रलि-आस्था /अनुकंपा पोलीस भरती-२०२४/११२८/२०२५, अमरावती शहर दिनांक ०५/०२/२०२५**

**नियुक्ती आदेश**

महाराष्ट्र राज्य पोलीस दलात पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवर पोलीस शिपाई यांची रिक्त पदे अनुकंपामधुन भरण्याकरीता महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील

तरतुदीनुसार **"पोलीस शिपाई" (गट-क, अराजपत्रीत)** पदाची पोलीस भरती २०२४ ची प्रक्रिया राबविण्यात आली आहे. सदर भरतीमध्ये पोलीस शिपाई पदावर खालील नमुद उमेदवाराची निवड करण्यात आली आहे. अनुकंपा पोलीस शिपाई भरती २०२४ मध्ये पोलीस शिपाई पदावर निवड झालेले खालील नमुद उमेदवार **चारीत्र्य पडताळणी व वैद्यकिय तपासणीमध्ये** पात्र ठरल्याने त्यांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गामध्ये व महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, २०१९ अन्वये वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर. एस-७ :- २१७००-६९१००, अधीक विशेष वेतन रुपये ७५०/- (महागाई भत्ता व लागु असलेले इतर भत्त्यासह) मध्ये **"पोलीस शिपाई"** पदी मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१, प्रशासन) मधील नियम ३३ मध्ये असलेल्या अधिकारानुसार **ही निव्वळ तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन पोलीस शिपाई पदावर नियुक्ती देण्यात येत आहे.**

| **अ.क्र.** | **उमेदवाराचे नाव** | **नियुक्तीचा प्रवर्ग** | **बक्कल क्रमांक** | **नियुक्ती पासुन देय वेतन** | **नेमणुकीचे ठिकाण** |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.आर्यन अनिल कांबळे | **अ.जाती/अनुकंपा** | ९९८ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |
| २. | श्री.सुरज उदयशंकर तिवारी | **खुला/अनुकंपा** | ५७७ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |
| ३. | श्री.सागर पांडुरंग धंडारे | **विमाप्र/अनुकंपा** | ८३३ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |

## **<u>अटी व शर्ती :-</u>**

१) उपरोक्त नमुद उमेदवारांना महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व वेळोवेळी सेवाप्रवेश नियम २०११ मध्ये झालेल्या सुधारणेच्या संपुर्ण तरतुदी लागु राहतील. उमेदवारांची नियुक्तीपुर्णत:अस्थायी स्वरुपाची राहील. तसेच उमेदवारांची अर्हता व उमेदवाराने सादर केलेल्या प्रमाण पत्रांच्या आधारे पोलीस शिपाई पदावर निवड करण्यांत आलेली आहे. त्यामुळे पोलीस भरतीच्या वेळी सादर केलेली विविध प्रमाणपत्रे, गुणपत्रिका बनावट/खोटे असल्याचे भविष्यात आढळून आल्यास तसेच कोणतीही अनर्हता आढळून आल्यास शासकीय सेवा पुर्वसूचना न देता किंवा कोणतेही कारण न दर्शविता समाप्त करण्यांत येईल. याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ तरतुदीनुसार **राज्य शासनाच्या सेवेत दिनांक ०१ नोव्हेंबर २००५ किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना नविन "परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना आता सुधारीत राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना" लागु ठरेल.** मात्र, सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली

सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना १९९८ लागु होणार नाही. तसेच वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४ दिनांक ३१ मार्च २०२३ तरतुदीनुसार परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचा-याचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यु उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृति उपदान तसेच शासन सेवेतुन निवृत्त होणा-या कर्मचा-यांना सेवा उपदान अनुज्ञेय राहील.

३) पूर्व चारित्र व वर्तणुक पडताळणी बाबत भरुन दिलेला साक्षांकन फॉर्म मध्ये खोटी माहिती पुरविलेली आहे किंवा वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडवुन ठेवल्याचे सेवाकाळात कधीही निदर्शनास आल्यास तसेच आपले विरुध्द फौजदारी खटले न्याय प्रविष्ठ आहेत किंवा नैतीक अंध:पतनाच्या गुन्हयात आपणास दोषी ठरवुन न्यायालयाने शिक्षा दिल्याचे किंवा पोलीस सेवेत अभियोग्य नसल्याचे आढळुन आल्यास किंवा इतर मार्गाने निदर्शनास आल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता आपली पोलीस शिपाई पदावरील सेवा समाप्त करण्यात येईल व आपणाविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

४) तुम्हास देण्यात आलेली नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या व हंगामी स्वरुपाची असुन तुम्हास कोणत्याही प्रकारची पुर्वसुचना अथवा नोटीस न देता सेवेतुन कमी करण्यात येईल.

५) पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारास या पदासाठी विहीत केलेले मुलभुत प्रशिक्षण पुर्ण करावे लागेल व संबंधीत परिक्षा चार संधीमध्ये उत्तीर्ण व्हावे लागेल. जर चार संधीमध्ये आपण परिक्षा उत्तीर्ण झाला नाही तर आपली सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही. वार्षिक वेतनवाढ रोखलेले उमेदवार संबंधीत परिक्षा विहीत संधित उत्तीर्ण झाल्यास, राखुन ठेवलेली वेतनवाढ त्यास देय होईल. परंतु वेतनवाढ रोखुन धरल्यामुळे देय होणारी थकबाकी मिळण्याचा हक्क असणार नाही.

६) प्रशिक्षणाच्या कालावधीत शिस्त ही अत्यंत उच्च दर्जाची राहील. वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन काटेकोरपणे होईल याची दक्षता बाळगावी. प्रशिक्षण कालावधीत गैरशिस्तीचे वर्तन किंवा असभ्य वर्तन आढळुन आल्यास त्वरीत सेवेतुन कमी करण्यात येईल. प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारच्या रजा मिळणार नाही तसेच सक्षम अधिकाऱ्यांच्या परवानगी शिवाय मुख्यालय परिसर सोडुन बाहेर जाता येणार नाही.

७) हिंदी आणि मराठी भाषा परिक्षेसंबंधीच्या नियमावलीनुसार जर त्यांनी या परिक्षा अगोदरच उत्तीर्ण केल्या नसतील किंवा त्या उत्तीर्ण होण्यापासुन त्यांना सुट मिळाली नसेल तर त्यांनी एतदर्थ मंडळाची मराठी / हिंदी विषयांची परिक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. अन्यथा तद्‌नंतर त्यांच्या पुढील वेतनवाढी रोखुन ठेवण्यात येईल.

८) शासन अधिसुचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र. (१७/२०००)/बारा, दिनांक २८ मार्च २००५ चे महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ तरतुदीनुसार आपणास दिनांक २८ मार्च २००५ रोजी किंवा त्यानंतर हयात असलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत नमुना-अ नुसार विहीत प्रतिज्ञापन भरुन दयावे लागेल तसेच हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक आढळुन आल्यास राज्य शासकिय सेवेच्या पदासाठी अनर्ह ठरविण्यात येवुन सेवेतुन कमी करण्यात येईल.

९) गृह विभाग शासन पत्र क्र. पीएसबी-०३११/प्र.क्र.५२१/पोल-५ अ, दिनांक २६.०९.२०११ व अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक अपोमस/पोशि भरती २०२२-२३/१७३/२०२३, दिनांक २.१.२०२५ अन्वये पोलीस शिपाई या पदावर निवड झालेल्या उमेदवारांनी, त्यांची शासकीय/निमशासकीय सेवेत नियुक्ती झाल्यास, व प्रशिक्षण कालावधीत पोलीस शिपाई या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास अशा उमेदवाराकडुन प्रशिक्षणावरचा खर्च म्हणुन प्रती महिना रु. २०००/- (प्रती मासीक दोन हजार फक्त) वसुल करण्यात येईल. तसेच इतर ठिकाणी खाजगी नोकरीमध्ये नियुक्त झाला असल्यास व तो उमेदवार राजीनामा देत असल्यास प्रशिक्षणावर झालेला सर्व खर्च प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्यासहीत, तसेच प्रशिक्षणावरचा खर्च म्हणुन प्रती महिना रु. २०००/- वसुल करण्यात येईल. तसेच शासकिय सेवेचा राजीनामा स्विकारण्याचा संबंधात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र. ३३/९२/८, दिनांक ०२ डिंसेबर १९९७ मधील सर्वसाधारण मार्गदर्शक सुचनेप्रमाणे तरतुदी बंधनकारक राहतील.

१०) पोलीस शिपाई पदावर नियुक्त केलेल्या कर्मचारी त्याच्या नियुक्तीच्या पोलीस घटकातुन इतर पोलीस घटकात बदलीसाठी गृहविभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पोल-५ ब दिनांक २६ ऑक्टोंबर २०१७ मधील तरतुदी लागु राहतील.

११) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर २०११ अन्वये सरळसेवा भरतीमध्ये ज्या उमेदवाराची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षीत असलेल्या जागेवर झाली आहे, अशा उमेदवारास, त्याच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहुन तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर, अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडुन करुन घेणे आवश्यक आहे. उमेदवाराने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी ऑनलाईन प्रस्ताव संबंधीत जात पडताळणी समिती कडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोच पावतीची छायाकिंत प्रत या कार्यालयात सादर करावी. जात पडताळणी समितीने आपले जात प्रमाणपत्र अवैध ठरविले, तर आपणांस दिलेली नियुक्ती त्वरीत रद्द करण्यात येईल आणि आपले विरुध्द महाराष्ट्र अनुसुचीत जाती, अनुसुचीत जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यातील तरतुदीनुसार त्वरीत कार्यवाही करण्यात येईल.

१२) पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या या उमेदवारांना मुंबई पोलीस अधिनियम १९५१, मुंबई पोलीस मॅन्युअल १९५९, मुंबई पोलीस (शिस्त व अपील) नियम १९५६ व राज्य शासनाने वेळोवेळी विहीत केलेले अन्य नियम लागु होतील.

१३) पोलीस शिपाई पदावर नियुक्त उमेदवारांची सेवाज्येष्ठता महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली २०२१ अन्वये निश्चीत करण्यात येईल.

१४) शासकिय सेवेत रुजु झाल्यानंतर उमेदवारास भारतीय संविधानाप्रती निष्ठा व गोपनियतेची शपथ घ्यावी लागेल.

१५) आपणांस नियुक्ती आदेश मिळाल्यानंतर सर्व प्रकारचा पत्रव्यवहार करतांना पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर येथील नियुक्ती आदेशात नमुद करण्यात आलेल्या बक्कल क्रमांकाचा उल्लेख व वापर करण्यात यावा.

१६) आदेश प्राप्त होताच आपण राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे तात्काळ हजर व्हावे. यापुर्वी कोणत्याही सेवेत नोकरी करीत असल्यास नोकरी सोडण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीकरीता पुरेसा अवधी म्हणुन ३० दिवस कालावधी देण्यात येईल. सदरचा विहीत मुदतीचा कालावधी संपल्यानंतर आपणांस पोलीस शिपाई पदावर रुजु करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

१७) उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी रुजु होण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रवासासाठी प्रवास भत्ता मिळणार नाही.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,
पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस